**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## पदवी, पदव्युत्तर व पुनर्मूल्यांकनमध्ये उत्तीर्ण, उशिरा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी सत्र २०१८-१९ या शैक्षणिक सत्रामध्ये पदवी, पदव्युत्तर व पुनर्मूल्यांकनमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची तसेच उशिरा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्कासह (मुळ परीक्षा शुल्क) व प्राचार्यांच्या शिफारसीसह अधिसूचना क्र. ९४/२०१८, दिनांक २० ऑगस्ट, २०१८ चे अधिन राहून सर्व संलग्नित महाविद्यालयांनी दि. १५ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावयाची असून विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे परीक्षा आवेदनपत्रे कुठल्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावयाची आहे.

याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर शैक्षणिक विभागप्रमुखांना पत्राद्वारे कळविली असून सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २६/०९/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी